# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद नाशिक

## ई-निविदा सुचना- १२( २०२६-२७, प्रथम प्रसारण )

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सन २०२४-२५ मधील मंजूर प्रस्तावित नळ पाणी पुरवठा योजनेच्या खालील नमुद केल्याप्रमाणे **म.स.स.** जिल्हा परिषद, नाशिक/ मजिप्र यांच्या कडील नोंदणीकृत मक्तेदाराकडून ई-निविदा मागविणेत येत आहेत.

| अं.क्र. | कामाचे नांव | तालुका | निविदा रक्कम रुपये (Without GST) | बयाणा रक्कम रुपये | कोऱ्या निविदेची रक्कम रुपये+GST | निविदा विक्रिची तारीख | निविदा उघडणेची तारीख | कामाची मुदत | मक्तेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नळ पाणी पुरवठा योजना करणे मांगोणे ता.पेठ | पेठ | १६९४४०७ | १७००० | ११०० | ६/०५/२०२६ वेळ- ९.००वा.सकाळी | २१/०५/२०२६ वेळ- १७.००वा संध्याकाळी | १२ महिने | म.स.स. |

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकिय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुदध्दीपत्रके, इत्यादीची माहिती फक्त http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**वरिल सर्व कामांची निविदा प्रपत्रे** http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेतस्थळावरुन **दि.**06.05.2026 **रोजी सकाळी** 9.00 **वाजेपासुन ते दि.**21.05.2026 **रोजी सांयकाळी** 17.00 **वाजेपर्यंत** अधिग्रहित (Download) व ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्र. 1 ( तांत्रिक लिफाफा ) शक्यतो **दि.**22.05.2026 **रोजी सकाळी** 11.00 **वा./ त्यानंतर** कार्यालयीन सोईच्या वेळी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचे कार्यालयात उघडणेत येईल.

1) **तांत्रिक लिफाप्यातील आवश्यक कागदपत्रे.**

(अ) प्रत्येक कामाचे निविदा प्रपत्र डाऊनलोड (Download) केल्याची फी व बयाणा / इसारा रक्कम निविदा सुचना मधील क्रं. 6 व 7 नुसारच्या रक्कमे प्रमाणे कामनिहाय Online e-Payment पध्दतीने जमा करणे बंधनकारक आहे.

(ब) सदर कामासाठी संबंधित व्यक्ती / संस्था ही म.जी. प्रा / जि.प./ या शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असावा. याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

(क) निविदाकाराने त्यांचे सन 2018-19 ते 2020-21 या वित्तीय वर्षाचे आयकर विवरणपत्र, पॅन कार्ड व जीएसटी नोंदणी प्रमापत्राच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

(ड) कंत्राटदारांनी नळ पाणी पुरवठाचे कामे केलेले असल्याचे प्रमाणपत्रे ( संबधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे ) जोडणेआवश्यक आहे.

(ई) कंत्राटदाराकडे निविदेत नमुद असलेल्या कामाचे क्षेत्रिय निकडीनुसार अद्यायावत मशिनरी व तांत्रिक मनुष्यबळाची माहिती जोडणे आवश्यक आहे.

(ई). 500/- वे बाँण्ड पेपरवर माहिती भरुन अपलोड करणे आवश्यक आहे.

(उ) निविदेच्या सर्व अटी व शर्ती मंजूरी असल्याचे तसेच निविदेसोबत जोडलेली अपलोड केलेली सर्व कागदपत्र खरी असल्याबाबतचे शपथपत्र रक्कम रु.500/- च्या स्टँप पेपरवर सोबत दिलेल्या विहित नमुन्यात सत्य प्रतिज्ञापत्र स्वत: स्वाक्षरी करुन अपलोड करणे बंधनकारक राहिल.

(ऊ) ज्या निविदाधारकांना निविदेमध्ये सहभाग नोंदवयाचा आहे, अशा मक्तेदार संस्था यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी किमाण दोन उपांगाची पाहणी उप अभियंता उप विभाग कळवण ग्रामीण पाणी पुरवठा यांचे समवेत Geo Tag सहित असलेले छायाचित्र सहीत स्थळपाहणी अहवाल सादर करणे आवश्यक असणार जेणे करुन मक्तेदार संस्थेला कुठे व काय काम करावयाचे आहे, याचा बोध होऊन निवीदा मक्तेदार संस्था सादर करीत आहे असे प्रमाणीत होईल.

**उपरोक्त अ ते उ मधील कोणतेही एक कागदपत्रे अपलोड (Upload) केलेले नसल्यांस सदर ठेकेदाराची निविदा अवैध करणेत येईल व त्याचा व्यापारी लिफापा उघडण्यांत येणार नाही तसेच कोणतेही कागदपत्रे (Upload) करण्यांस वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणर नाही. निविदा समितीचा निर्णय अंतिम बंधनकारक राहील. ठेकेदाराला निविदा फेटाळलयाबद्दल सपष्टीकरण मागता येणर नाही .**

**निविदेतील प्रस्तुत कोणत्याही कामासाठी भाववाढ अनुज्ञेय राहणार नाही.** म.जि.व पं.स.लेखासंहिता 1968 मधील प्रचलित नियमानुसार कामास मुदतवाढ देणे, नुकसान भरपाई अथवा दंड आकारणी लावणे व प्रसंगी काम काढुन घेणे याबाबतचे सर्व अधिकार **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांचे असतील.

2) **व्यापारी लिफाफा-**

1. निविदा देकार अंदाजपत्रकिय दरापेक्षा 1% कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) Additional Security भरण्याची आवश्यकता नाही .

2. निविदाकारचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1.01% पासुन ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% एवढया रकमेचा नाशिक येथे देय असलेला **मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक** या नावाने काढलेला धनाकर्ष (Demand Draft) निविदा प्रसिध्दीच्या दिनांक नंतरच्या तारखेचा Additional Security Deposit **जो लघुतम निविदा धारक असेल त्याने निविदा आर्थिक लिफापा उघडलेपासून 8 दिवसाच्या आंत कार्यालयामध्ये जमा करावा अथवा** रोख चलनाने भरणा करावा.

3. कामाची परिशिष्ट ब मधील रक्कम ही वस्तु व सेवा कर वगळुन ( Without GST ) आहे.

4. निविदा धारकाचा देकार निविदाधीन किंमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेव्हढया रकमेचा वरील (4) प्रमाणे येणा-या रकमेसह नाशिक येथे देय असलेला **मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक** या नावाने काढलेला एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) (उदा. 14% पर्यंत कमी दर 10% पर्यंत 1% व (14% - 10%) 4% असे एकुण 5% रक्कम तसेच निविदा धारकाचा देकार निविदाधिन किंमतीपेक्षा 15% पेक्षा जास्त कमी असेल तर देकार 15% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे त्याच्या दुप्पट रक्कमेचा ( उदा. 16% पर्यंत कमी दर 10% पर्यंत 1% + (15% - 10%) 5% +( 16% - 15%) 2% असे **एकुण 8%** सदर (Demand Draft) Additional Security Deposit जो लघुतम निविदा धारक असेल त्यानेच **निविदा उघडल्यापासून 8 दिवसाच्या** आंत कार्यालयामध्ये जमा करणेत यावा अथवा रोख चलनाने भरणा करावा .

5. **व्यापारी लिफाफा क्र. 2 उघडलेनंतर फक्त जो निविदाधारक लघुतम निविदा धारक ठरेल त्यानेच धनाकर्ष (Demand Draft) Additional Security Deposit कार्यालयांत तात्काळ 8 दिवसाच्या आंत जमा करावयाचा आहे अथवा** रोख चलनाने भरणा करावा . तसेच लघुतम निविदाधारकाने मुळ (Demand Draft) Additional Security Deposit 8 दिवसांत कार्यालयांत जमा न केलेस व निविदा कार्यवाहीसाठी आवश्यक कागदपत्राची आवश्यक त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपर, अनामत रक्कमेचा धनाकर्ष / रोख स्वरुपात चलनाव्दारे पुर्तता करणेस कसूर केलेने प्रचलित नियमानुसार त्यास प्रमाणपत्र नोंदणी प्राधिकारी यांचेकडे काळया यादीत समाविष्ठ करणेची कारवाई प्रस्तावित केली जाईल. तसेच जि.प.च्या सर्व विभागाकडील कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेणेस प्रतिबंध केला जाईल याची नोंद घ्यावी. त्यानंतर निविदेबाबत कार्यालय घेईल तो निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहील.

3. **निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणीकृत असलेने असलेने ई प्रणाली व्दारे उघडलेचा / शुध्दीपत्रक प्रसिध्दीचा मेसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाची असुन त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीवर कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

4. निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अथवा निविदा मंजूरी नंतर कामाचे कोणत्याही टप्यावर कागदपत्रांच्या विधीग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदर निविदाधारकाची निविदा बाद करणेत येईल तसेच तसेच सदरची बाब कायदेशीर / फौजदारी कार्यवाहीस पात्र राहिल.

5. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

6. ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.23/09/2012 मधील परिच्छेद क्र.3 (2) अन्वये 3 पेक्षा कमी निविदा धारकांनी निविदेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास

उक्त शासन निर्णयाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे निविदेस मुदतवाढ देण्यांत येईल अथवा निविदा पुर्नप्रसारण करणेत येईल.

7. दोन किंवा दोनपेक्षा अधिक समान न्युनतम देकार आढळल्यास System Generated BoQ Comparative Chart (संगणकीकृत) प्रमाणे न्युनतम देकाराची निविदा न्युनतम प्रमाण मानुन स्विकारण्यात येईल.

8. निविदा सादरीकरण हे दोन लिफाफा पध्दतीने (Technical & Financial Bid) सादर करणे आवश्यक आहे.

9. निविदा काराने ऑनलाईन पोर्टलवर अपलोड केलेल्या निविदेच्या कागदपत्रांचे अवलोकन केलेले आहे व त्या मधील सर्व अटी व शर्ती निविदा कारास मान्य आहे असे समजुन त्याने निविदा सादर केलेली आहे असे समजण्यात येईल.

10. निविदा काराने रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात (**with Affidavit Before magistrate / Notary**) प्रतिज्ञापत्रात 1) कामाचे नाव 2) Tender ID 3) Tender Amount 4) सध्याचा मोबाईल क्रमांक 5) Email ID 6) संस्थेचा अधिकृत पत्ता 7) PAN No 8) स्वत:च्या बँकेचे खातेनंबर ज्यावरुन Internet banking व्दारे रक्कम जमा केली आहे. 9) बँकेचे नाव शाखा व IFS कोड 10) Upload केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे शपथपत्र 11) बी-1 निविदा फॉर्मवरील अटी व शर्ती मला मान्य आहेत. 12) स्वाक्षरी नमुना ही सर्व माहिती नमुद करावी.

11) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सीएसटी-2017/प्र.क्र.08/इमा 2 दि. 29/1/2019 अन्वये कंत्राटदाराचा लिफाफा क्रं. 2 उघडण्यात आल्यानंतर जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास जिल्हा परिषदेमधील सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास एक वर्षासाठी प्रतिबंध करण्यात येईल.

12) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएसटी/2018/प्र.क्र.127/इमा 2दि. 28 नोव्हेंबर 2018 अन्वये रु. 500/- च्या स्टॅम्प पेपर वर अपलोड करण्यांत येणारे सर्व कागदपत्र खरी असुन ती खोटी / बनावट असल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदार जबाबदार असलेबाबत स्वत:चे प्रतिज्ञापत्र सादर करावे.

13) निविदा सादरीकरण / स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करणेत येतील. निविदा संबंधी कोणतेही मुळ कागदपत्रे प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी निविदाकाराने कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही.

14) आर्थिक लिफाफा / निविदा उघडल्यानंतर कंत्राटदार यांना इतर कोणत्याही कंत्राटदारावर त्यांच्या पात्र / अपात्रतेवर आक्षेप नोंदवु शकनार नाही.

15) जी. एस.टी कलम-

1) The rate to be quoted by the contractor must be inclusive of all other relevant taxes expect GST No. extra payment of this account will be made to the contractor.

a) Bidder shall quotes his rate excluding GST.

b) GST shall be paid on the amount of bill of the work done as per prevailing guidelines rate of GST during the period of work done as applicable.

c) The rates quoted by the contractor shall be deemed to be inclusive of the labour welfare cess and other taxes {Other than GST} that the contractor will have to pay for the performance of his contract. The Employer will perform such duties in regard to the५ deduction of such taxes at source as per applicable law.

16) निविदा प्रपत्रातील व नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक रहातील.

17) प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निविदा समिती / निम्न स्वाक्षरीतांनी राखून ठेवला असून निविदा भरणाऱ्या कोणत्याही कंत्राटदारास निविदा फेटाळल्याबदल स्पष्टिकरण मागता येणार नाही.

---///स्वाक्षरी//--

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद नाशिक**

Signature Not Verified

Digitally signed by RAVINDRA VEDU MAHAJAN
Date: 2026.05.07 17:33:41 IST
Location: Maharashtra-MH

---///स्वाक्षरी//--

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**